## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०१/२०१७

**१) नौकरीची आमीस दाखवुन पैसांची फसवनुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २४/१०/२०१६ ते दि.१९/०१/२०१७ पर्यंत यातील फिर्यादी तुषार मधुकर रामटेके वय २७ वर्ष रा. तिसरा माळा गंगा संकुल राजगोपलचारी वार्ड भंडारा हे एस.सी.एल. कंपनीत आपल्या मोबाईलवरून नौकरी मिळवीण्या करीता ऑन लाईन अर्ज केला असता यातील आरोपीने फिर्यादीस कंपनीचे नियम सांगुन आरोपीने त्याचे ९१५०१००६५४४०८७८ या अकाउंट नंबरवर टप्पा टप्याने १९,२००/–रू रंक्कम मागवुन घेवुन फिर्यादीस कोणतीही नौकरी व पैसे परत न करता फसवणुक केल्याने फिर्यादीचे लेखी तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६५(ड) माहीती तंत्रज्ञान अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी चाबुकस्वार पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक दि. १८/०१/२०१७ चे १९.४५ वा. दर. यातील फिर्यादी रवीशंकर देवराम हलमारे वय ३७ वर्ष रा. लाखनी हे त्याची लाल रंगाची बजाज डिस्कवहर मोटार सायकल क्र. एम. एच. ३६/पी ३५५५ कि. २५,०००/–रू ची आपले दवाखाण्या समोर उभी असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) लोखंडी कळयाने इसमाच्या मस्तकावर मारून जखमी करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०१/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी प्यारेलाल सत्यवान तिरपुडे वय २० वर्ष रा. आंबेडकर वार्ड बेला हा आठवडी बाजारात पानठेल्यावर खर्रा खाण्यास गेला असता त्यावेळी यातील आरोपी हा पानठेल्यावर आला व फिर्यादी ला धक्का दिला असता फिर्यादीने आरोपीला धक्का का मारला असे हटकले असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करून हातातील लोंखडी कळा काढुन फिर्यादीचे डाव्या बाजुचे मस्तकावर मारून जखमी केले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४, ५०४, ५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.